
# परिशिष्ट

# परिशिष्ट 1


मराठी साहित्य परिषद
तेलंगण राज्य, हैदराबाद
पंचधारा
वर्ष ६६ वे, अंक पहिला
एप्रिल २०२३ ते जून २०२३
चैत्र ते ज्येष्ठ १९४५
डॉ. व. दि. कुलकर्णी
न. शे. पोहनेरकर
राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद पासोडी बघत असतांना
छायाचित्रात : श्री. न. शे. पोहनेकर, डॉ. राजेंद्रप्रसाद, श्री. हनुमंतराव वैष्णव एम. पी.
परिषदेचे अध्यक्ष प्रा. रा. व. माडेकर
सरस्वतीच्या सान्निध्यात
मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद
RNI Reg. No. 32307/79
मूल्य : १२५/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

वर्ष ६६ वे, अंक पहिला
एप्रिल २०२३ ते जून २०२३
चैत्र ते ज्येष्ठ १९४५

## संपादक मंडळ

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
माधव रामराजे चौसाळकर
डॉ. शैलजा जोशी
मीना जहागिरदार
व्यंकटेश कुलकर्णी
डॉ. गायत्री शिरोळे

मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphydgmail.com

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
(For both accounts) या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. १२५/-
टपाल खर्च : रु. ३५/-

अक्षरजुळणी व मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, पुणे. फोन : ९३२६०८६२८५

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखांशी, विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय ........................................................................................ ५

मराठी साहित्य आणि संशोधनातील मानदंड
कै. दादासाहेब उर्फ न. शे. पोहनेरकर ............ मंगला पोहनेरकर (प्रतिभा जोशी) ... ७

सयाजीराव महाराजांचे ग्रंथनिर्मिती
क्षेत्रातील कार्य ..................................... देवदत्त कदम ...................... २०

अब्राहम लिंकनने
ग्रंथपाल यांना न लिहिलेले पत्र .................. श्री. रणजीत धर्मापुरीकर .......... ३२

प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी :
शिष्योत्तम आणि गुरुश्रेष्ठ ......................... डॉ. जयंत वष्ट ..................... ३६

तेलंगणा प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथालय
'श्री कृष्ण देवराय आंध्र भाषा निलयम' .......... डॉ. नम्रता बागडे ................. ५१

ग्रंथपरीक्षण

१) निसर्ग आणि माणूस यांच्या
उद्ध्वस्ततेची कहाणी 'ओरबिन' ........ प्रा. विनायक लक्ष्मण बापट ....... ५७

२) मूल्यनिष्ठेचा सम्यक वेध -
'शरण जीवन दर्शन' ..................... डॉ. रवींद्र बेम्बरे .................. ६२

३) तळझिरा ................................. डॉ. गायत्री शिरोळे ................ ६६

मराठी साहित्य परिषद कार्यवृत्त ........................................................ ६९

स्वागत नव्या पुस्तकांचे ................................................................. ७७

लेखक परिचय ............................................................................ ७८


## मुखपृष्ठाविषयी

- श्री. न. शे. पोहनेरकर यांचे हस्ताक्षर
- दासोपंतांची पासोडी घेऊन दिल्लीला गेलेल्या श्री. न. शे. पोहनेरकर यांचे राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांचेसह छायाचित्र.
- मराठी साहित्य परिषदेने प्रकाशित केलेल्या 'संत साहित्याची संकल्पना' या ग्रंथासह लेखक डॉ. व. दि. कुलकर्णी.

ग्रंथ परीक्षण : १

# निसर्ग आणि माणूस यांच्या उद्ध्वस्ततेची कहाणी 'ओरबिन'



**प्रा. विनायक लक्ष्मण बापट**

गावाच्या उद्ध्वस्ततेचे चित्रण करणाऱ्या अनेक कादंबऱ्या आपणाला नव्वदोत्तर काळात लिहिल्या गेल्याचे दिसते. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून गावची पारंपरिक व्यवस्था उद्ध्वस्त होण्यास स्वातंत्र्योत्तर काळातच प्रारंभ झाला आणि प्रा. आनंद यादव, रा. रं. बोराडे अशा अनेकांच्या कादंबरी लेखनातून हे उद्ध्वस्तपण चित्रित झाले आहे. नव्वदोत्तर काळात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रक्रियांमुळे हे गावचे उद्ध्वस्तीकरण अधिक तीव्र झाले. गावच्या उद्ध्वस्तीकरणांची अनेक कारणे आहेत, परंतु गोव्यासारख्या अत्यंत छोट्या आणि निसर्ग संपन्न राज्याचे खनीज उद्योगामुळे जे उद्ध्वस्तीकरण झाले आहे त्याचे भयाण आणि वास्तवदर्शी पण तेवढेच कलात्मक चित्रण 'ओरबिन' मधून नवोदित परंतु कसदार लेखन करणाऱ्या गजानन देसाई यांनी केले आहे. बृहनमहाराष्ट्रातील लेखकांसाठी असलेला २०२० चा महाराष्ट्र सरकारचा, सयाजीराव गायकवाड पुरस्कार विजेती ही कादंबरी आहे. एक गावच नव्हे तर एक पंचक्रोशीच कशी उद्ध्वस्त होते याचे हे चित्रण आहे आणि हे उद्ध्वस्तपण दुहेरी आहे. त्या ठिकाणचा निसर्ग, तेथील जैवविविधता आणि पारंपरिक जीवन यांचे उद्ध्वस्तपण तर आहेच पण त्याचबरोबर माणसामाणसातील नातेसंबंध, नैतिकता आणि एकूणच माणुसकीचे होणारे उद्ध्वस्तपण जास्त चटका लावणारे आणि वाचकाला अंतर्मुख होवून विचार करायला लावणारे आहे. खाण उद्योग व त्याचे दुष्परिणाम याचे चित्रण या अगोदरही गोमंतकीय पार्श्वभूमीच्या काही कादंबऱ्यांमधून झाले आहे. सुभाष भेंडे यांची 'उद्ध्वस्त', रा. का. बर्वे यांची 'होमकांड' ही काही उदाहरणे म्हणून सांगता येतील. 'ओरबिन' ही या खाण जीवनावरील ज्या कादंबऱ्या आहेत त्यापेक्षा वेगळे चित्रण करणारी कादंबरी आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लेखकाने अगदी वेगळ्या धर्तीवर या कादंबरीची उभारणी केली आहे. या कादंबरीत कोणी एक नायक वा कोणीतरी एक खलनायक नाही. विविध वृत्तीप्रवृत्तीची माणसे आपल्या स्वभावधर्मानुसार या कादंबरीत वावरताना दिसतात. पारंपरिक जीवन व्यतीत करणारी एक पंचक्रोशी आणि त्या पंचक्रोशीत खाण उद्योग सुरू झाल्यानंतर त्या पंचक्रोशीतील लोकांच्या जीवनमानात,

वागणुकीत, त्यांच्या दिनमानात, त्यांच्या वैचारिकतेत आणि त्यांच्या एकूणच जगण्यात जो बदल झाला त्याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. या बदलत्या जीवनक्रमाचे चित्रण करत, एका कोसळणाऱ्या पंचक्रोशीचे लेखकाने अत्यंत तटस्थपणे वर्णन केले आहे. आणि हेच या कादंबरीचे वेगळेपण आहे. ज्या पंचक्रोशीतील लोकांचे दोन वेळा खाण्याचे वांदे होते त्या लोकांना उपजाविकेचे एखादे भक्कम साधन सापडणे हे मृगजळातील पाण्यासारखेच होते. त्यामुळे या खाणींना तसा विरोध होण्याचे कारणच नव्हते. अर्थात विनायक गोडसे सारखा अगदी सुरुवातीपासून त्याला विरोध करणारा एखाद-दुसरा होता. पण ज्यांना जगण्याची भ्रांत होती त्यांना अशा लोकांच्या सांगण्याची फिकीर नव्हती. सुरुवातीला लोकांना पैसा दिसू लागला आणि कधी नव्हे ती अनेकांना वेगवेगळ्या मार्गातून पैशांची उब मिळाली; परंतु हळूहळू या सर्वातूनच पंचक्रोशीच उद्ध्वस्त होत गेली आणि याचेच चित्रण लेखकाने अत्यंत कलात्मकतेने केले आहे. मुळगावात ज्याच्या बऱ्याच पिढ्या कुळागरे करण्यात गेल्या त्या विनायक गोडसेच्या कुळागरातील वर्षानुवर्षे वाहाणारा गरम पाण्याचा झरा आटणे आणि पाण्याचा प्रवाह बदलल्याने कुळागराची झालेली वाताहात ही सुरुवात आहे. हे उद्ध्वस्तपण निसर्गाचे तर आहेच पण मानवी मूल्यांचे उद्ध्वस्तपण मनाला जास्त व्यथित करणारे आहे. पैसा माणसाला हेकेखोर, गर्वीष्ठ आणि भावनाशुन्य बनवतो याची अनेक उदाहरणे या कादंबरीत सापडतात. हा येणारा पैसा आटला की तोच माणूस किती दीन आणि लाचार होतो त्याचीही अनेक उदाहरणे यात आहेत. बाहेरचे लोक गावात वस्तीला आल्याने वाढलेली गुंडगिरी, नवीन व्यवसायामुळे पारंपरिक शेती व्यवसायाकडे लोकांचे होणार दुर्लक्ष आणि शेती बागायती करण्यासाठी जमीनच उपलब्ध नसणे, अनैतिक संबंधात होत जाणारी वाढ, कुटुंबातील सदस्यांत वाढत जाणारा दुरावा, वाढलेली व्यसनाधिनता, हळूहळू क्षयासारख्या रोगाने सर्वत्र पसरलेले हातपाय या सर्वांचे हृदयस्पर्शी वर्णन या कादंबरीत आहे. एकदा खाणीतील माल संपत आल्यावर आपला नफा घेऊन लोकांना त्यांच्या कर्मावर सोडून जाणारे खाणमालक आपणाला आजच्या जगाचे खरे रूप दाखवतात. या सर्वांचे चित्रण लेखकाने अत्यंत तटस्थपणे पण तेवढ्याच भेदकतेने घडविले आहे.

पारंपरिक गावाची मानसिकता अगदी नेमकेपणाने चितारण्यात लेखक कमालीचा यशस्वी झाला आहे. गावातील भुताखेतांबद्दलचे समज आणि त्या संदर्भात घडलेल्या घटनांतून कादंबरीतील ग्रामीण संवेदना नेमकेपणाने व्यक्त झाली आहे. बैल आजारी पडला म्हणून चिंतीत होणारी आणि तो मेल्याने अतीव दुःखी झालेली शेवंता एकूणच पारंपरिक शेतकरी महिलेची प्रातिनिधिक रूप म्हणून आपल्यासमोरे येते. या कादंबरीत आलेल्या अनेक दंतकथा या कादंबरीतील

लोकसंस्कृती अधिक ठळकपणे अधोरेखित करतात. या संदर्भात गिधाडांबद्दल असलेली दंतकथा तसेच गान्हाणे घातल्यानंतर आलेली वावटळ हा प्रसंग मुळातून वाचण्यासारखा आहे. ''आरे, चेडू म्हणजे कुसको म्हाल, कुसच्या पयली तो भायर काडपाक जायो'' या प्रकारच्या संवादातून गावजीवनांतील स्त्री विषयीचा पारंपरिक दृष्टिकोन व्यक्त होतो तर 'ओरबिन' मध्ये पडून कंबर मोडून घरात पडलेल्या मनोहरची बायको विडीच्या पानाला लागणारी कुड्याची पाने विकून स्वतःचा संसार करते, हे माहीत असल्याने जंगलात लाकडे गोळा करण्यासाठी गेलेली शेवंता कुड्याचे झाड तोडत नाही. यातून ग्राम जीवनातील सहजतेने व्यक्त होणारा दयाळू भाव दिसून येतो. 'धालो' सारखा पारंपरिक उत्सव खेळणाऱ्या महिला, देवाचा प्रसाद घेतल्याशिवाय कोणत्याच गोष्टीची सुरुवात न करणारे गावकरी या सर्वांतूनही पारंपरिक ग्रामसंस्कृतीचे दर्शन या कादंबरीत प्रत्ययकारकरित्या घडते. गावातील जातीय संघर्षाचे चित्रणही काही प्रसंगातून झाले आहे; पण हा संघर्ष तीव्र होणार नाही याची काळजीही सर्व गावकरी घेताना दिसतात. खाण व्यवसाय म्हणजे एक दुष्टचक्र आहे हे लेखकाने या कादंबरीतून नेमकेपणाने मांडले आहे. खाण व्यवसाय वाढू लागला तशी वाढू लागलेली दारुची दुकाने, मटक्याचा तेजीत चाललेला व्यवसाय, पत्यांचा खुलेआम राजरोस सुरू झालेला जुगार, खाणीतील अपघातातून होणारे मृत्यू या सर्वांतून या दुष्टचक्राची आपणाला कल्पना येते.

या कादंबरीची भाषा हा या कादंबरीचा सर्वात मोठा विशेष आहे. निवेदनसाठी प्रमाण भाषा आणि संवादासाठी स्थानिक भाषेचा वापर करून लेखकाने कादंबरीत जिवंतपणा आणला आहे. 'म्हज्या अळवाक कितली खाज ते म्हाका सांगोक जाया' किंवा 'उलयल्ले तोंड आणि झवलेली गांड कशीच वगी रावची ना' किंवा 'घडे भरल्याशिवाय वडे मेळा नात', 'भाटकार घोव चिंधयो भोव', अशा म्हणीतून किंवा 'कोणींच्यो भाटी आणि भाटीच्या कोंणी केन्ना जापत ते सांगो नजों' अशा अनेक लोकोक्तींमधून या कादंबरीला एक वेगळे रूप प्राप्त झाले आहे. या कादंबरीत लेखकाने वापरलेले रचनातंत्र आणि भाषा यामुळे ही कादंबरी अधिक प्रभावी झाली आहे. या कादंबरीत अनेक पात्रे येतात. एका अर्थाने ही कादंबरी म्हणजे असंख्य पात्रांची चित्रशालाच आहे. प्रत्येक पात्राला स्वतःचे अस्तित्व आहे. या संदर्भात कादंबरीत फक्त काही क्षणांपुरते येणारे साजू धनगराचे पात्र पाहाण्यासारखे आहे.

या कादंबरीसंबंधात आणखी काही गोष्टींची मुद्दामहून नोंद केली पाहिजे ज्यामुळे ही कादंबरी एका वेगळ्या उंचीवर पोहचली आहे.

ग्रामीण कादंबरीच्या मर्यादांबद्दल बोलताना ''आजच्या कादंबऱ्यानांही

व्यक्तिवादाचे वर्तुळ पार करता आल्याचे दिसत नाही.'' अशी तक्रार समीक्षक नागनाथ कोत्तापल्ले यांनी एके ठिकाणी व्यक्त केली आहे. व्यक्तिवादाची सर्व वर्तुळे भेदून अस्सल सामुहिक भाव व्यक्त करणारी कादंबरी म्हणून आपणाला 'ओरबिन' कडे पाहता येते. दुसरे महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे समर्थक ग्रामीण साहित्य म. फुले यांचा तात्त्विक दृष्टिकोन स्वीकारीत असल्याचे म्हणत असले तरी प्रत्यक्ष ग्रामीण कादंबरीच्या लेखनात मात्र फुल्यांची बहुसंस्कृती वादाची आणि धर्म, परंपरा व संस्कृतीच्या फुल्यांना अभिप्रेत असलेली चिकित्सावादी भूमिका अपवादानेच कोणी स्वीकारताना दिसतो. या कादंबरीत मात्र लेखकाने ही भूमिका स्वीकारली आहे. म्हणूनच या कादंबरीतील एक पात्र देवावर फूल वाहूनही, ''मी तुला नमस्कार करणार नाही, कारण तुझ्या समोर सगळा विद्ध्वंस झाला आहे आणि तू फक्त बघत बसला आहेस.'' अशा आशयाचे वाक्य उद्गारताना दिसते. त्याचप्रमाणे आकाशात गिधाडे घिरट्या घालू लागतात तेव्हा शाळेतील मुले गुरुजींना, आजीने सांगितलेला, 'कुमयाच्या झाडावर टोच मारुन गिधाडे बघतात पाणी आल्यास गप्प बसतात, रक्त आल्यास आकाशात फिरू लागतात, कारण त्यांना आता भक्ष मिळणार याची चाहूल लागते' हा लोकसमज सांगतात तेव्हा, गिधाडे आकाशात फिरण्यामागील वैज्ञानिक कारण गुरुजी विद्यार्थ्यांना समजावून सांगताना दिसतात. लोकसंस्कृतीचे अनेक संदर्भ घेऊन या कादंबरीला लेखकाने आशय संपृक्तता प्राप्त करून दिली आहे. त्याचबरोबर फुल्यांची चिकित्सावादी भूमिका स्वीकारून फुल्यांना अभिप्रेत असलेला आधुनिकतावादी दृष्टिकोनही कादंबरीला प्राप्त करून दिला आहे.

या कादंबरीचा आणखी एक विशेष म्हणजे ही कादंबरी फक्त समस्या मांडून वा उद्ध्वस्ततेचे चित्रण करून थांबत नाही तर भविष्याचा आशादायक सूर देखील ही कादंबरी व्यक्त करते. बबनच्या 'आता आमी करप किते?' या प्रश्नाला अनिलने दिलेले उत्तर भविष्याचे सूचन करणारे आहे. तो म्हणतो, 'शिकचे पडटलें मायनिंग हो एकूच व्यवसाय ना या जगान! आणि कूय खूप आसात! होंडा, कुंडई, मडकप आतां व्हडल्यो व्हडल्यो कंपन्यो येतल्यो खय थंय कराप काम.' अनील स्वतःही खाणीवरील आपली चांगली नोकरी सोडून बस बांधणी प्रकल्प सुरू करतो या चित्रणांतून खाण उद्योगाला पर्यायी बरेच व्यवसाय आहेत, फक्त डोळसपणे ते स्वीकारण्याची गरज आहे, याचे सूचन लेखकाने मार्मिक पणे केले आहे.


आजच्या मराठी कादंबरीला म्हणजेच आजच्या कादंबरीकाराला स्वतःचे असे काही तत्त्वज्ञान नसते आणि त्यामुळेच जागतिक कादंबरी लेखनाचा विचार करता मराठी कादंबरी दुबळी ठरते असे निरीक्षण डॉ. हरिश्चंद्र थोरात तसेच इतरही अनेक अभ्यासकांनी

नोंदविले आहे. या कादंबरीचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे ही कादंबरी स्वतःचे तत्त्वज्ञान तसेच लेखकाची नैतिक व्यग्रता व्यक्त करणारी अशी ही कादंबरी आहे. खाणी नसतील तर जगायचं कसं? हा प्रश्न या कादंबरीत निर्माण होतो, कारण माणसाचा संघर्ष हा जगण्यासाठी असतो आणि जगण्याच्या निकडीतूनच जगण्याचे तत्त्वज्ञानही आकार घेत असते. आपले पूर्वज खाणी नसताना जगले पण आपण आताही तसेच काष्ट्या नेसून पेज जेवून जगावे असे व्यवस्थेला अपेक्षित आहे का? हा महत्त्वाचा प्रश्न आजच्या संदर्भात ही कादंबरी निर्माण करते म्हणजेच तो आजच्या वास्तवाला भिडते आणि जगण्याचा विचार करते. पण पैसा म्हणजेच सर्वस्व नाही, पैशाने सुख शांती आणि आनंद विकत घेता येत नाही हे अधोरेखित करून जगण्यासाठी निसर्ग आणि मानव यांच्यातील समतोल साधत सम्यक विकासाची वाट आपणाला शोधावी लागेल हे ही कादंबरी अगदी नेमकेपणाने सांगते. परमेश्वर कोण याची लेखकांने गुरुजी आणि अनिल यांच्या संवादातून केलेली समीक्षाही लेखकाची नैतिक भूमिका व्यक्त करणारी आहे. परमेश्वर एकच तर मग जागोजागी भेटणारे देव कोण? देवाने माणसं बनवली तर माणसांनीच देवाच्या मूर्ती का फोडल्या? हा विद्ध्वंस करणाऱ्यांना आपण रानटी लुटेरे म्हणतो मग स्वतःच्या स्वार्थासाठी गावंच्यागावं उद्ध्वस्त करणाऱ्या या खनीज उद्योगवाल्यांना कोण म्हणावे? लेखकांने निर्माण केलेले प्रश्न प्रत्येकाला खोलवर आत्मचिंतन करायला लावणारे आहेत. पैसा जेव्हा सहजतेने येतो तेव्हा त्याची मोठी किंमत भावी पिढ्यांना चुकवावी लागते हे मोठे सत्य लेखकांने या कादंबरीतून अधोरेखित केले आहे. एकूणच खाण व्यवसाय आणि त्याचे ग्रामजीवनांवर होणारे गंभीर परिणाम चित्रित करणारी ही अत्यंत महत्त्वाची अशी कादंबरी आहे. या कादंबरीने ग्रामीण कादंबरी लेखनाला एक नवीन आयाम प्राप्त करून दिला आहे असे निश्चितपणे म्हणता येते आणि म्हणूनच फक्त गोमंतकीय कादंबरी लेखनातच नव्हे तर एकूणच मराठी ग्रामीण कादंबरी लेखनात मैलाचा दगड ठरावी अशी ही कादंबरी आहे.

**नाव** : ओराबिन<br>
**लेखक** : गजानन देसाई<br>
**प्रकाशक** : शिवअमृत प्रकाशन<br>
**पृष्ठ** : २३०<br>
**मूल्य** : २४०/- रुपये

■

## परिशिष्ट 2



वर्ष : १८ वे / अंक : दुसरा
मे-जून-जुलै-ऑगस्ट २०२३

अधिदेशक
• गो. तु. पाटील • नीरजा
• रणधीर शिंदे • नीतीन रिंढे

संपादक
**शीतल पावसकर-भोसले**

संपादक मंडळ
**नीतिन आरेकर**
**रेणुका ओझरकर**

मुद्रक / प्रकाशक
**राजमुद्रा प्रिंटर्स, ठाणे**

मुखपृष्ठ
**केशव कासार**

अक्षरजुळणी, मांडणी व सजावट
**प्रशांत पांचाळ / लता पांचाळ**

मुद्रितशोधन
**लता पांचाळ**

संपादकीय व व्यवस्थापकीय
पत्रव्यवहाराचा पत्ता
**सारंग पाटील**
कृतज्ञता,
पटेल कॉलनी, विंचूर रस्ता,
येवला - ४२३४०१, जि. नाशिक
भ्रमणध्वनी - ८३१७२६५७०५
navanustubh@gmail.com

मूल्य
**२० रुपये+डाकहशील**
अंक किरकोळ विक्रीकरिता नाही.

## अनुक्रम

**संपादकीय** ०३

**लेख**

☞ संभोगदर्शनाची कल्पना / सुजन सॉनटॅग
भाषांतर : मिलिंद मालशे, चिन्मय धारूरकर ०६

**चित्रपट**

☞ संकल्पना / संतोष पाठारे १०

**निबंध**

☞ मराठीतील ग्रामीण कादंबरीचे तत्त्वज्ञानः
स्वरूप आणि चिकित्सा / विनायक बापट २६

**कविता**

☞ चांदनी भी रस्ता... / दफ़ा औरंगाबादी /
भाषांतर - गायत्री नातू ४७

☞ ग़ाह-ए-गुनाह / अरीफ़ा हुसैन /
भाषांतर - चिन्मय शुभदा ४८

☞ बच्चा बड़ा हो ... / दफ़ा औरंगाबादी /
भाषांतर - चिन्मय शुभदा ४९

**कथा**

☞ निचंता / आशिष वरघणे ५०

**पुस्तक परीक्षण**

☞ काळोखाच्या कविता :
मातीच्या दुःखापेक्षा मातीच वाट्याला
न आल्याचे दुःख सांगणारी ग्रामीण कविता /
देवानंद सोनटक्के ७१

☞ लेखकांसाठी सूचना ८०

निबंध

# मराठीतील ग्रामीण कादंबरीचे तत्त्वज्ञान: स्वरूप आणि चिकित्सा

- विनायक बापट

१

कादंबरीला तत्त्वज्ञान असते का किंवा मराठी कादंबरीला असे काही तत्त्वज्ञान आहे का? असे प्रश्न मराठी कादंबरीच्या अनुषंगाने विचारता येण्यासारखे आहेत. ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करीत असताना ग्रामीण कादंबरीला स्वतःचे असे काही तत्त्वज्ञान आहे का? याची चिकित्सा करणे क्रमप्राप्त आहे. समाजाच्या स्वरूपाविषयीचे, समाजाच्या एकूण जडणघडणीविषयीचे प्रश्न जसे एखाद्या समाजशास्त्रज्ञाला पडतात तसेच ते एखाद्या कादंबरीकारालाही पडतात. लेखकाने आपल्या कादंबरी-लेखनासाठी समाजाचाच आधार घेतलेला असतो. या प्रश्नांची उत्तरे शोधत असताना पृष्ठभागावर जे दिसते त्याच्या पलीकडे जाऊन कादंबरीकार विविध सामाजिक व्यवहारांची बौद्धिक स्वरूपाची सुसंगत व स्पष्टीकरणात्मक मांडणी करत असतो. अशी कृती कादंबरीकार करतो तेव्हा तो विशिष्ट व्यूह, विचारसरणी किंवा विशिष्ट तत्त्वज्ञान स्वीकारून आपले लेखन करतो, असे म्हणता येते. द्रष्ट्या कादंबरीकाराकडून अशाप्रकारची मांडणीच अपेक्षित असते. समाजात वावरत असताना नेमके महत्त्व कशाला द्यायचे? अनेक वर्षांच्या परंपरेतून निर्माण झालेल्या व्यवस्थेला की कालानुरूप झालेले बदल पचवून नव्याने प्रस्थापित होत असलेल्या परिवर्तनशील मूल्यव्यवस्थेला? अशा प्रकारचे प्रश्न संवेदनशील लेखकासमोर निर्माण होतातच अशावेळी कोणतीतरी एक बाजू घेऊन किंवा समन्वयाची भूमिका घेऊन काहीएक स्वतंत्र मांडणी आपल्या लेखनातून लेखक करतो तेव्हा त्यातून तत्त्वज्ञान अधोरेखित होत असते. अर्थात, एकूण कादंबरीचे म्हणून एकच तत्त्वज्ञान असते की लेखकानुसार प्रत्येक कादंबरीला वेगळे तत्त्वज्ञान असते? असा प्रश्नही निर्माण होतो. याचे उत्तर देताना आपण असे म्हणू शकतो की, काही सैद्धांतिक किंवा तत्त्वज्ञानात्मक व्यूह समाजात अस्तित्वात असतात. त्याला विचारांचे समूह (School of Thoughts) असे म्हणतात. त्यामुळे या विचारांच्या अनुषंगाने व

एका विशिष्ट स्वरूपाच्या लेखनात यातील कोणती विचारधारा जास्त प्रभावीपणे व्यक्त झाली आहे त्यानुसार त्या कादंबरीचे तत्त्वज्ञान काय आहे हे सांगता येते. कादंबरीनुसार लेखकाचे तत्त्वज्ञान बदलू लागल्यास त्या लेखकाकडे कोणतीही एकच एक तात्त्विक भूमिका नाही, असे म्हणावे लागते.

कादंबरीचा विचार करताना तिची सामाजिकता महत्त्वाची असते. ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना ती अधिक महत्त्वाची ठरते. सामाजिकता हा ग्रामीण कादंबरीचा मूलभूत घटक आहे. समाज कसा असावा? समाजाची रचना कशाप्रकारची असावी? या सामाजिक व्यवस्थेमध्ये प्रत्येकाला अर्थपूर्ण जगण्याचा अधिकार कशाप्रकारे मिळेल? अशा प्रकारच्या प्रश्नांची चर्चा कादंबरीच्या सामाजिक तत्त्वज्ञानासंदर्भात केली जाते. या संदर्भात ज्येष्ठ समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणतात, "सामाजिक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात मराठी कादंबरी दुबळी आहे असे म्हणता येईल. असे निश्चित व जाणीवपूर्वक तत्त्वज्ञान हरीभाऊंकडे होते, म्हणून ते मोठे कादंबरीकार ठरले, असेही म्हणता येईल. श्री. व्यं. केतकर, वा. म. जोशी, विभावरी शिरूरकर किंवा नंतरचे मुक्तिबोध यांच्यासारख्या कादंबरीकारांमध्येही ते काही प्रमाणात होते, हा त्यांचा वेगळेपणा सांगता येईल. बहुतेकांना आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानाची सुस्पष्टपणे जाणीवच नसते, असे म्हणता येईल. असे असले तरी समाजाविषयीच्या या जाणिवेमध्ये गेल्या काही वर्षात महत्त्वाची स्थित्यंतरे होत आली आहेत आणि अलीकडच्या कादंबरीने चोखाळलेल्या नव्या वाटा सुस्पष्ट करताना या स्थित्यंतराचे स्वरूप पाहणे अगत्याचे आहे." (थोरात २०१० : ३४५-३४६) काही मोजके अपवाद वगळता सामाजिक तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मराठी कादंबरी ही दुबळी आहे अशा प्रकारचे मत थोरात यांनी व्यक्त केले आहे. विशिष्ट तत्त्वज्ञान घेऊन मराठी कादंबरीचे लेखन न झाल्याने मराठी कादंबरी खूप मोठी उंची गाठू शकली नाही असेही त्यांना म्हणायचे असावे. अलीकडच्या कादंबरीत काही स्थित्यंतरे जाणवतात असे त्यांनी म्हटले आहे. ही अलीकडच्या काळातील स्थित्यंतरे ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात असावीत असे म्हणता येते. कारण यासंदर्भातील स्पष्टीकरण करताना त्यांनी आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात, "कोसलानंतरच्या काळात नेमाडे यांची कादंबरी वास्तववादाकडे वळली. संदिग्धतेला, असंगतीला महत्त्व देणाऱ्या आधुनिकतावादाची संगत त्यांनी सोडून दिली. समीक्षेमध्येही त्यांनी वास्तववादाच्या मूल्ययुक्ततेचा जोरदार पुरस्कार केला. याशिवाय

आपल्या समीक्षेमधून आणि मुलाखतींमधून १९८०च्या दशकाच्या प्रारंभापासून देशीवादी भूमिका जोरदारपणे मांडण्यास त्यांनी प्रारंभ केला. देशीवादी भूमिकेमध्ये संस्कृतीच्या उदात्तीकरणाला, भूतकाळाच्या गुणगौरवाला, परंपरेच्या सामर्थ्याला महत्त्वाचे स्थान असते. देशीवाद आणि वास्तववाद यांची युती होऊन अस्मितांच्या राजकारणात उपयोगी पडणारे आणि वास्तवाच्या यथातथ्य चित्रणावर विसंबणारे कादंबरीचे नवे प्रारूप मराठी कादंबरीला सापडले. अलीकडच्या मराठी कादंबरीवर या प्रारूपाचा फार मोठा प्रभाव आहे. नेमाडे यांच्या वास्तववादाने व देशीवादाने महानगरी केंद्रापासून दूर असलेल्या नव्याने लिहू लागलेल्या लेखकांना सहज पचनी पडणारी आणि त्यांच्या परंपरेशी नाते असणारी दृष्टी दिली. मूल्यव्यवस्थेविषयीचा विधिनिषेध दिला. या एकूण वातावरणाबद्दल मी सतत चिकित्सक भूमिका घेत आलो असलो तरी मराठी कादंबरीला सापडलेली ही एक नवी वाट आहे याबाबत शंका नाही." (थोरात २०१०: ३४४) महानगरी केंद्रापासून दूर असलेल्या नव्याने लिहू लागलेल्या लेखकांबद्दल ते बोलत असल्याने ते ग्रामीण लेखकांबद्दलच बोलत आहेत हे निश्चित! याचा अर्थ नेमाडेंनी देशीवादाचे जे नवीन प्रारूप दिले आहे किंवा देशीवादी भूमिका स्वीकारून जे ग्रामीण लेखक लिहित आहेत त्यांच्याबद्दल ते बोलत आहेत. म्हणजेच आधुनिक ग्रामीण मराठी कादंबरीची जडणघडण देशीवादी जाणिवांची बैठक स्वीकारून होत आहे असे त्यांना म्हणायचे आहे. या ठिकाणी आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती अशी की, दलित चळवळीचे तत्त्वज्ञान जसे दलित साहित्य निर्मितीला कारणीभूत ठरले तसे ग्रामीण साहित्याबद्दलदेखील सांगता येते का? दलित साहित्याचा विचार करताना दलितांमध्ये नवसंवेदना निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या विचारांचे, मूल्यांचे प्रभावी चित्रण, विद्रोह, नकार, नवनिर्मिती यांचा उद्घोष दलित साहित्यातून झालेला दिसतो. एक विचार घेऊन, एक तत्त्वज्ञान घेऊन, त्याच्या आधारावर दलित साहित्य निर्माण झाले आणि सर्वांगीण अशा समाजपरिवर्तनाचे एक शस्त्र म्हणून दलित साहित्याचा उपयोग केला गेला. ग्रामीण साहित्याचा विचार करता अशा प्रकारचे कोणतेही तत्त्वज्ञान ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागे होते असे दिसत नाही. मूलतः दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यांची निर्मितीप्रक्रियाच सर्वस्वी भिन्न आहे. चळवळीतून साहित्य हा जो क्रम आपणाला दलित साहित्याबद्दल सांगता येतो तो ग्रामीण साहित्याबद्दल सांगता येत नाही. ग्रामीण साहित्याची चळवळ ही ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला सुरुवात झाल्यानंतर काही विशिष्ट उद्दिष्टे डोळ्यासमोर

ठेवून नंतरच्या काळात सुरू झाली आणि त्याचे तात्त्विक अधिष्ठान शोधण्याचा प्रयत्न बऱ्याच नंतरच्या काळात केला गेला. ग्रामीण कादंबरीच्या तत्त्वज्ञानाची अधिक चिकित्सा करण्याआधी ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण साहित्याची चळवळ याचा ऊहापोह करणे आवश्यक आहे, कारण हा विषय ग्रामीण मराठी कादंबरीच्या तत्त्वज्ञानाशी जोडलेला आहे.

२

१९७७ च्या सुमारास ग्रामीण साहित्याची चळवळ उदयाला आली. डॉ. आनंद यादव आणि त्यांच्या इतर काही सहकार्यांच्या पुढाकारातून या ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय झाला. ग्रामीण साहित्याला या चळवळीच्या माध्यमातून तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मध्यवर्ती मराठी साहित्यावर शहरी मध्यमवर्गाचा प्रभाव आहे. या शहरी मध्यमवर्गीय मानसिकतेतून जे साहित्य निर्माण होते त्यालाच 'मुख्य'प्रवाहातील साहित्य म्हणून मान मिळतो. ग्रामीण पार्श्वभूमीवरचे, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवणारे जे साहित्य निर्माण होते त्याला सापत्नभावाची वागणूक दिली जाते. ग्रामीण साहित्याची निर्मिती करणाऱ्या साहित्यिकांकडे उपहासात्मक दृष्टीने पाहिले जाते. हा सगळा अनुभव लक्षात घेऊन ग्रामीण साहित्याला त्याचे स्वतःचे व्यासपीठ मिळाले पाहिजे, ग्रामीण साहित्याला त्याची स्वतःची ओळख मिळाली पाहिजे आणि ग्रामीण साहित्याची सखोल समीक्षा झाली पाहिजे या उद्देशाने या चळवळीचा पाया घातला गेला. आपल्या देशाचा विचार करता आजही ७०% पेक्षा जास्त लोक खेड्यात राहतात. असे असूनही त्यांना अभिव्यक्तीची संधी हवी त्या प्रमाणात मिळत नव्हती. त्यांनी अभिव्यक्तीचा प्रयत्न केला तरी त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. हे सगळे बदलायचे असेल व ग्रामीण साहित्याला 'मुख्य' प्रवाहातील साहित्य म्हणून ओळख मिळायची असेल तर ग्रामीण साहित्याची चळवळ उभी राहिली पाहिजे, ग्रामीण साहित्याला स्वतःचे व्यासपीठ मिळाले पाहिजे, प्रत्येक टप्प्यावर ग्रामीण साहित्याची दखल घेतली गेली पाहिजे, ग्रामीण साहित्याला त्याचा मानसन्मान मिळाला पाहिजे आणि ग्रामीण साहित्याची सखोल समीक्षा झाली पाहिजे असे अनेकविध हेतू डोळ्यांसमोर ठेवून ग्रामीण साहित्यचळवळीला प्रारंभ झाला. १९७७ मध्ये पुणे येथे झालेला 'तरुण ग्रामीण लेखकांचा मेळावा' हा या चळवळीचा प्रारंभबिंदू म्हणून सांगता येतो.

आपण जेव्हा चळवळ असे म्हणतो तेव्हा तिला स्पष्ट असे सामाजिक, सांस्कृतिक, तात्त्विक अधिष्ठान असावे लागते. असे तात्त्विक अधिष्ठान नसेल तर कोणतीच चळवळ उभी राहू शकत नाही. ग्रामीण साहित्याची सैद्धान्तिक भूमिका मांडण्याचा प्रयत्न या ग्रामीण साहित्याच्या चळवळीद्वारे केला गेला. ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान निश्चित करून त्यादृष्टीने कृतीची अपेक्षा या चळवळीला अभिप्रेत होती. ग्रामीण साहित्याच्या चळवळीसंदर्भात चळवळीच्या प्रवर्तकांनी चळवळीची सैद्धान्तिक मांडणी करण्याचा प्रयत्न केला. या चळवळीचे तात्त्विक अधिष्ठान कोणते? ही चळवळ कोणत्या विचारांची बांधिलकी स्वीकारते? याबद्दलचा ऊहापोह आनंद यादव, रा. रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, द. ता. भोसले, भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे अशा चळवळीतील बिनीच्या विचारवंतांनी केला आहे. कोणत्या विचारांची बांधिलकी ही चळवळ स्वीकारते? याचे उत्तर देत असताना परिवर्तनवादी, शोषणविरोधी, जीवनवादी विचारांची बांधिलकी ही चळवळ स्वीकारते असे उत्तर सर्वांनीच दिले आहे. अर्थात एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाची बांधिलकी स्वीकारते का? याबाबतीत मात्र कोणतीच निश्चित भूमिका या चळवळीच्या प्रवर्तकांनी घेतलेली नाही. ग्रामीण साहित्य चळवळ ही म. फुल्यांचा वैचारिक वारसा सांगते. शोषणाविरोधी, अन्यायाविरोधी, सामान्यांच्या उत्थानासाठी, त्यांच्या अधिकारासाठी व न्यायासाठी संघर्ष करण्याची भूमिका घेते. यासंदर्भात ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे एक महत्त्वाचे भाष्यकार डॉ. वासुदेव मुलाटे यांनी व्यक्त केलेले मत विचारात घेतले पाहिजे. ते म्हणतात, "मानवी महत्ता वाढविणारे, सर्वपरीच्या शोषणाविरुद्ध आवाज उठविणारे, दीनदुबळ्यांना बळ प्रदान करणारे, त्यांच्यात आत्मजागृती निर्माण करणारे विचार ग्रामीण साहित्याचे अधिष्ठान आहे..... ग्रामीण साहित्याच्या चळवळीने महात्मा फुल्यांबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, वि. रा. शिंदे यांच्या विचारांबरोबरच, महात्मा गांधी, आगरकर, लोकहितवादी, लोकमान्य टिळक आणि सावरकर यांचे विचारही एका विशिष्ट मर्यादेपर्यंत वर्तमानातील वास्तवाच्या पातळीवर स्वीकारले आहेत." (मुलाटे २००२ : १८) प्रस्तुत मत लक्षात घेता कोणत्याही एका वैचारिक संप्रदायाची भूमिका न स्वीकारता सर्वसमावेशक अशी वैचारिक भूमिका ग्रामीण साहित्य चळवळीने घेतलेली दिसते. अशा प्रकारची भूमिका घेऊन् सर्वच विचारांना आपल्यात सामावून घेण्याची कसरत ग्रामीण साहित्य चळवळीने केली आहे हे लक्षात येते. ग्रामीण साहित्य चळवळीपासून कोणीही वेगळा, तुटलेला राहू नये ही त्यामागील

भूमिका असावी. पण त्यामुळे ही चळवळ कोणतीच वैचारिक स्पष्टता देऊ शकली नाही, असे खेदाने म्हणावे लागते. ग्रामीण साहित्याच्या एकूण चळवळीवरही अनेक गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत. ग्रामीण साहित्याचे एक महत्त्वाचे अभ्यासक भास्कर भोळे यांनी या चळवळीबद्दल भाष्य करताना, "चळवळीतील लेखकांना त्यांच्या ग्रामीण पार्श्वभूमीमुळे, तसेच घरच्या गरिबीमुळे प्रचंड संघर्ष करावे लागले असले तरी जन्मसिद्ध अपात्रतांना कधीच तोंड द्यावे लागले नाही. समाजरचनेतील त्यांचे स्थान कधीकाळी घृणास्पद वा तिरस्करणीय होते असेही म्हणता यायचे नाही. उतरंडी समाजव्यवस्थेने ज्ञानाचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद केले होते, हे खरे असले तरी त्यांची पूर्वास्पृश्यांसारखी सर्वांगीण कोंडी केली होती असे दिसत नाही. आधीपासून लिहिणाऱ्या व ख्यातकीर्त झालेल्या काही ग्रामीण लेखकांनी त्यांना गरज वाटल्यामुळे या चळवळीची स्थापना केली आहे. लेखनातून स्वतंत्र अस्मितेचा शोध घेणे, ग्रामीण संस्कृतीचे वेगळेपण सिद्ध करणे किंवा त्या संस्कृतीचे जतन-संगोपन करणे, असे हेतू तिथे अभावानेच आढळतात. ज्योतीराव फुले यांचे नाव चळवळीच्या प्रवर्तकांनी पुढे कधीतरी आपले तत्त्वज्ञ-मार्गदर्शक म्हणून सांगितले असले तरी फुल्यांच्या बहुसंस्कृतिवादी व मूलगामी बंडखोरीशी या चळवळीला कधीच फारसे कर्तव्य नव्हते." (भोळे २०१० : ४८-४९) असे म्हटले आहे. यातील सर्वात महत्त्वाचा आक्षेप म्हणजे फुल्यांच्या विचारांशी या चळवळीला काही विशेष देणेघेणे नाही हा आहे. तसेच त्यांचे इतर आक्षेपही विचार करायला लावणारे आहेत. या संदर्भात अधिक विश्लेषण करण्याआधी आणखी एक अभ्यासक महेश खरात यांनी या चळवळीवर जे आक्षेप घेतले आहेत त्याचाही विचार करावा लागेल. मग सर्वांचा एकत्रित विचार करणे सोईचे होईल. महेश खरात म्हणतात, "ग्रामीण साहित्य चळवळीने महात्मा फुले यांना ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला; पण फुले हे ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी बसू शकत नाहीत. कारण फुले हे धर्माची चिकित्सा करतात. ग्रामीण साहित्यिक धर्माची चिकित्सा करीत नाही. फुले परंपरा नाकारतात. ग्रामीण साहित्यिक परंपरेला धरून आहेत. फुले देवा-धर्माबरोबरच धर्मग्रंथांचे ऑडिट करतात. ग्रामीण साहित्यात देवा-धर्माबद्दल आदर बाळगला जातो. फुले सण-समारंभ, विधी, उत्सव यांची समीक्षा विवेकाच्या पातळीवर करतात. ग्रामीण साहित्यात सण, उत्सव परंपरेला धरून येतात. फुले हे ग्रामीण माणसाची मानसिकता एक 'माणूस' म्हणून समजावून घेतात. ग्रामीण साहित्य ग्रामीण माणसाची मानसिकता लेखकाच्या

दृष्टिकोनातून (चष्म्यातून) पाहतात. म्हणून फुले ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी बसू शकत नाहीत. जर फुले यांना ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी ठेवायचे असेल तर रीतिरिवाज, विधी, परंपरा, सण-उत्सव, देव, धर्म, रूढी यांची विवेकाच्या पातळीवर ग्रामीण साहित्यिकांनी मांडणी केली पाहिजे." (खरात २००८ : २२)

उपरोक्त दोन्ही अभ्यासकांनी या एकूण चळवळीवर जे आक्षेप घेतले आहेत त्यांचा विचार मुळापासून करणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण साहित्याची निर्मिती अगोदर झाली आणि तिला वैचारिक बैठक देण्याचा प्रयत्न नंतर झाला. दलित साहित्याप्रमाणे 'चळवळीतून विशिष्ट तत्त्वज्ञान घेऊन निर्माण झालेले साहित्य' असे त्याचे स्वरूप नाही. म. फुल्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सर्वात अगोदर आवाज उठवला व शेतकऱ्यांच्या तत्कालीन हलाखीच्या परिस्थितीचे नेमके विश्लेषण करताना शेतकऱ्यांच्या दुर्धर स्थितीला ब्राह्मण, शेटजी कसे जबाबदार आहेत हे तर सांगितलेच, पण त्याचबरोबर आपल्या साहित्यातून या विरुद्धचा आवाज बुलंद केला. सत्यशोधक समाजाची स्थापना करून वैचारिक मांडणीला कृतिशीलतेचा आधार दिला. म. फुल्यांची वैचारिक परंपरा स्वीकारून साहित्यनिर्मितीलाही प्रारंभ झाला होता परंतु तो अल्पायुषी ठरला. कादंबरी वाङ्मयाचा विचार करता कृष्णराव भालेकर यांची *बळीबा पाटील*, रा. वि. टिकेकर (धनुर्धारी) यांची *पिराजी पाटील*, मुकुंदराव पाटील यांची *ढढ्ढाशास्त्री परान्ने* या कादंबऱ्या म. फुल्यांचा वैचारिक वारसा सांगणाऱ्या आहेत. परंतु याची परंपरा निर्माण होऊ शकली नाही. कदाचित परंपरावादी, नियतीवादी, जातीच्या उच्चनीचतेच्या, दैववादी मनोवृत्तीत अडकलेल्या ग्रामीण समाजाला फुल्यांचा चिकित्सावाद पचवणे जड गेले असावे. त्यामुळे चळवळीच्या मार्गदर्शकांनी म. फुल्यांचा वारसा सांगितला असला तरी वर उल्लेख केलेल्या कादंबऱ्यांचा अपवाद करता म. फुल्यांची वैचारिकता स्वीकारून साहित्यनिर्मिती झाली नाही. त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे म्हणजे चळवळीच्या पुरस्कर्त्यांनी म. फुल्यांचा जयघोष केला तरीदेखील या चळवळीनंतरच्या काळात जी ग्रामीण कादंबरी निर्माण झाली त्यावर म. फुल्यांच्या विचाराचा विशेष प्रभाव दिसत नाही, हे नोंद घेण्यासारखे आहे.

३

ग्रामीण कादंबरीच्या तत्त्वज्ञानात्मक बैठकीचा विचार करताना आपणाला प्रारंभापासून निर्माण झालेल्या ग्रामीण कादंबरीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

सुरुवातीच्या काळातील कृष्णराव भालेकर किंवा रा. वि. टिकेकर (धनुर्धारी) यांच्या कादंबऱ्यांचा अपवाद करता, ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीमागच्या प्रेरणा या रंजनवादीच राहिल्या आहेत. ग्रामीण साहित्याचे महत्त्वाचे अभ्यासक नागनाथ कोत्तापल्ले यांनीदेखील १९६० पर्यंतचे ग्रामीण साहित्य हे रंजनवादी परंपरेतूनच निर्माण झाले आहे हे मान्य केले आहे. त्यामुळेच ज्याप्रमाणे दलित चळवळीतून प्रेरणा घेऊन दलित साहित्य निर्माण झाले त्याप्रमाणे फुल्यांचा वैचारिक वारसा वा प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली, असे म्हणता येत नाही. १९२० नंतर महात्मा गांधीनी 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली. याचा प्रभाव तत्कालीन बऱ्याच कादंबरीकारांवर पडला. वा. म. जोशी, वि. स. खांडेकर, मामा वरेरकर अशी काही महत्त्वाची नावे या संदर्भात सांगता येतात. ग्रामविकासाच्या संदर्भात आपल्या कादंबऱ्यांतून स्वप्नाळू आदर्शवाद जोपासण्याचा प्रयत्न या कादंबरीकारांनी केला. ग्रामउद्धाराची त्यांची तळमळ प्रामाणिक असली तरी प्रत्यक्षातील ग्रामजीवनापेक्षा हे स्वप्नाळू आदर्शवादी ग्रामजीवन खूपच वेगळे असल्याने या कादंबऱ्या कृतकच ठरतात. त्यामुळे गांधीवादाच्या प्रभावातून मराठीत जी काही ग्रामीण कादंबरी लिहिली गेली ती ग्रामीण कादंबरीला कोणतेच तत्त्वज्ञान देऊ शकली नाही. फार तर काही एक स्वप्नाळू आदर्शवाद तिने निर्माण केला एवढे म्हणता येते. साधारणतः १९२० ते १९५० या कालखंडाचा विचार करता र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ. बी. रघुनाथ यांचा ग्रामीण कादंबरीकार म्हणून उल्लेख केला जातो. त्यांनी ग्रामजीवनाचे चित्रण प्रभावीपणे केले आहे. परंतु या सर्वच कादंबरीकारांनी गावातील समस्यांवर व तेथील वास्तवावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा कादंबरीच्या 'रंजनमूल्या'चा जास्त विचार केला. तत्कालीन कादंबरीलेखनावर ना. सी. फडके यांच्या कादंबरीलेखनाच्या तंत्राचा व विचारांचाही जबरदस्त प्रभाव असल्याने हे झाले असावे. त्यामुळे ग्रामीण कादंबरीचे वेगळे मापदंड निर्माण करण्याऐवजी लोकांचे मनोरंजन करणे एवढ्यापुरतीच ही कादंबरी मर्यादित राहिली. व्यंकटेश माडगूळकरांच्या *बनगरवाडीने* मराठी ग्रामीण कादंबरीला एक नवा आयाम दिला; परंतु ती कादंबरीदेखील त्रयस्थाच्या भूमिकेतून लिहिली गेल्यामुळे व एका वस्तीलाच केंद्रबिंदू ठरवून लिहिली गेल्याने ग्रामजीवनाचे तपशील ती पुरवू शकली नाही. विभावरी शिरूरकर यांची *बळी* आणि अण्णा भाऊ साठे यांची *फकिरा* यां दोन कादंबऱ्यांचा मात्र मुद्दामहून उल्लेख केला पाहिजे कारण साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव या कादंबऱ्यांवर आहे. ग्रामीण भागातील किंवा

ग्रामीण जनतेचे वास्तव दाखविण्याचा प्रयत्न या कादंबरीकारांनी केला आणि हे करीत असताना याला जबाबदार कोण? याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्नही केला. या दोन कादंबऱ्यांनी साम्यवादी विचारांचा प्रवाह ग्रामीण साहित्याला आणून जोडला, असे म्हणता येते. अण्णा भाऊ साठे यांनी नंतरचे कादंबरी लेखन बहुतांशी मनोरंजनाच्या पातळीवर केल्याने जी एक समर्थ ग्रामीण कादंबरी मराठीत निर्माण होऊ शकली असती ती झाली नाही. *धग* या कादंबरीचे लेखन करून खरी ग्रामीण जाणिवेची कादंबरी मराठीत आणली ती उद्धव शेळके यांनी! या कादंबरीने इतिहास घडविला. पण त्यानंतरच्या त्यांच्या कादंबऱ्या त्यांनी जागवलेल्या अपेक्षांची परिपूर्ती करणाऱ्या ठरल्या नाहीत. शंकर पाटील यांची *टारफूला* ही कादंबरीदेखील ग्रामीण जाणिवांनी समृद्ध अशी कादंबरी आहे. महत्त्वाचे म्हणजे एक गावच या कादंबरीचा नायक आहे. दुर्दैवाने शंकर पाटीलदेखील नंतरच्या काळात या उंचीची कादंबरी लिहू शकले नाहीत व तेसुद्धा मनोरंजनात्मक कादंबरी लेखनाकडे वळले. त्यामुळे कोणताच एक विचार मराठी ग्रामीण कादंबरीत प्रवाही राहू शकला नाही. हमीद दलवाई यांच्या *इंधन* या कादंबरीचा या ठिकाणी मुद्दामहून उल्लेख केला पाहिजे. बदलत्या ग्रामीण जीवनाचा अत्यंत समतोल आढावा घेणारी आणि भविष्यात काय होईल याचे सूतोवाच करणारी ही कादंबरी आहे. पण त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांचे लेखन अर्ध्यावरच थांबले. ज्यांनी ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू केली व म. फुल्यांना आपले प्रेरणास्थान मानले त्या आनंद यादव, रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यांचा विचार करता त्यांनी स्वतःच्या लेखनातूनही फुल्यांची चिकित्सावादी दृष्टिकोन स्वीकारल्याचे दिसत नाही. या संदर्भात आनंद यादव यांची *गोतावळा* व रा. रं. बोराडे यांची *पाचोळा* या दोन्ही कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. यात ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण आढळते पण फुल्यांची चिकित्सावादी दृष्टी मात्र दिसत नाही. ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण मराठी कादंबरीला विशिष्ट तत्त्वज्ञान दिले नसले तरी काहीच दिले नाही असेही म्हणता येणार नाही. महत्त्वाचे म्हणजे या चळवळीने ग्रामीण लेखकांना आत्मविश्वास दिला. विविध विषयांवर लिहिण्याची ऊर्मी त्यांच्यामध्ये निर्माण केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या लेखकांना आत्मभान आले. कादंबरीलेखन अधिक वास्तववादी झाले. ग्रामीण कादंबरीतील मनोरंजनमूल्य कमी झाले, गावातील स्थितीचे नेमके आकलन मांडण्यावर भर दिला गेला. त्यामुळे मराठी ग्रामीण कादंबरीचा चेहरामोहरा

बदलला व ती अधिक सूक्ष्मतेने वास्तवाच्या विविध अंगांचे विश्लेषण करू लागली, असे म्हणता येते.

१९८०नंतर काही प्रमाणात बदललेले कादंबरीचे स्वरूप याची साक्ष देते. ग्रामीण संवेदनशीलता जागृत ठेवून १९८०नंतरचे कादंबरीलेखन होऊ लागले. त्यामुळे ऐंशीनंतरच्या कादंबऱ्या कृषिकेंद्रित असल्या तरी विषयांचे वैविध्य या कादंबऱ्यांतून दिसून येते. यासंदर्भात काही कादंबऱ्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पुरूषोत्तम बोरकर यांची *मेड इन इंडिया* शेतकऱ्यांच्या एकूण हलाखीच्या स्थितीसाठी आपली एकूण व्यवस्थाच कशी कारणीभूत आहे याचे उत्तम विश्लेषण करते. भाषेचा अत्युत्तम वापर हे या कादंबरीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असून खेडे व शहर यातील जगण्याचा तुलनात्मक विचार हेदेखील याचे वेगळेपण म्हणून सांगता येते. उपहास, उपरोध यांच्या साहाय्याने केलेला बोचरा विनोद आपणाला हसवतो; त्यापेक्षाही अधिक अस्वस्थ करतो. मृत्युविषयक आलेले चिंतन या कादंबरीला एक वेगळा आयाम प्राप्त करून देते. म्हणूनच एकूण मराठी ग्रामीण कादंबरीत ग्रामीणतेच्या नवीन कक्षा शोधणारी ही कादंबरी आहे. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या *उलट चालिला प्रवाहो* आणि *गांधारीचे डोळे* या दोन्ही कादंबऱ्या परिवर्तनाची दिशा सूचित करतात. म. फुल्यांचा चिकित्सावादी दृष्टिकोन काही प्रमाणात त्यांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्त झाला आहे. राजन गवस यांच्या *चौंडकं* आणि *भंडारभोग* या कादंबऱ्या समाजातील कुप्रथांवर आघात करतात तर वासुदेव मुलाटे यांची *विषवृक्षाच्या मुळ्या* ही कादंबरी सहकार क्षेत्रातील अनागोंदीचे चित्रण करते तर विश्वास पाटील यांची *पांगिरा* ही कादंबरी पाणीप्रश्नाची तीव्रता मांडते. एकूणच १९८० ते ९० या दशकातील कादंबऱ्या ग्रामीण समस्या व अस्सल ग्रामजीवन अत्यंत ठळकपणे आपल्यासमोर मांडतात. त्यामुळे ग्रामीण माणसाचे दुःख केंद्रस्थानी ठेवून या कादंबऱ्यांचे लेखन झाले असून ग्रामीण माणसाच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान या कादंबऱ्या व्यक्त करू लागल्या, असे म्हणता येते. या सगळ्याचा आढावा घेतल्यानंतर आपण या निष्कर्षाप्रत येतो की ग्रामीण चळवळीने म. फुल्यांचा उल्लेख ग्रामीण चळवळीचे प्रेरणास्थान म्हणून केला असला तरी प्रत्यक्षात फुल्यांचे तत्त्वज्ञान ग्रामीण कादंबरी स्वीकारू शकलेली नाही. फक्त ही चळवळ ग्रामीण साहित्याच्या विकासाला पूरक ठरली आहे, असे निदर्शनास येते. त्यामुळे भास्कर भोळे आणि महेश खरात यांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते म. फुल्यांच्या प्रेरणेतून ग्रामीण कादंबरीची उभारणी झालेली नाही या संदर्भात तरी ग्राह्य धरावे लागतात.

१९९० नंतरच्या काळात एकूणच जगात आमूलाग्र बदल झाल्याचे दिसते. तंत्रज्ञानाचा झालेला विकास आणि संगणकक्रांती यांनी या विकासात मोलाचे योगदान दिले. जागतिक स्तरावर कॉर्पोरेट क्षेत्राचा झालेला विकास आणि त्यामधून साकारलेले जागतिकीकरण यामुळे एकूण सर्वच व्यवस्थांची उलथापालथ झाली आणि त्याचे गंभीर परिणाम ग्रामीण क्षेत्रावर झाले. १९९०नंतर भारत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामील झाल्यामुळे भारतात खाजगीकरण आणि उदारीकरणाची प्रक्रिया जोरात सुरू झाली. या सर्वाचा परिणाम लेखनावर होणेही अपरिहार्य होते. १९८०च्या दरम्यानच भालचंद्र नेमाडे देशीवादाची मांडणी करीत होते. १९९० नंतर ज्या प्रकारच्या घडामोडी झाल्या, संस्कृतीच्या सपाटीकरणाला ज्या वेगाने सुरुवात झाली, स्थानिक भाषांचा संकोच ज्या जलद गतीने होऊ लागला व इंग्रजीचे प्रस्थ ज्या प्रकारे वाढू लागले. या सर्वाची प्रतिक्रिया म्हणून देशीवादी जाणिवा उफाळून आल्या. भालचंद्र नेमाडे ज्या देशीवादाची मांडणी करीत होते त्या देशीवादाचे प्रारूप कादंबरीकारांना विशेषतः ग्रामीण कादंबरीकारांना आपलेसे वाटू लागले व याला अनुसरून बऱ्याच प्रमाणात मराठी ग्रामीण कादंबरीचे लेखन होऊ लागले. भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादाची थोडक्यात चर्चा करायची झाल्यास प्रत्येक मानवी संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण असते आणि तिला स्थल, काल, प्रदेशाचे निश्चित परिमाण असते. या सर्वाचे भान ठेवून लेखन करणे म्हणजे देशीवादी जाणिवेला अनुसरून लेखन करणे होय. आक्रमक संस्कृतीला विरोध करून स्वसंस्कृतीविषयी काहीशा अभिनिवेशाने लेखन करणे म्हणजे देशीवाद असेही म्हणता येईल. नव्वदोत्तर काळात लेखन करणारे राजन गवस, रंगनाथ पठारे, शेषराव मोहिते, किशोर सानप, भास्कर चंदनशिव, सदानंद देशमुख, रवींद्र शोभणे, भारत काळे, कृष्णात खोत, प्रवीण बांदेकर, आसाराम लोमटे अशा बऱ्याच लेखकांवर काही एक प्रमाणात देशीवादाचा प्रभाव निश्चितच आहे. ग्रामीण साहित्य चळवळीचे पुरस्कर्ते जो म. फुलेंच्या तत्त्वज्ञानाचा वारसा सांगतात त्यात आणि भालचंद्र नेमाडे यांनी दिलेले देशीवादी प्रारूप यात नेमका फरक काय आहे? हा प्रश्न यासंदर्भात उपस्थित करता येईल. म. फुल्यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार केल्यास ते चिकित्सक भूमिका घेताना दिसतात. ते धर्माची, परंपरागत चालत आलेल्या व्यवस्थेची चिकित्सा करतात. व्यवस्थेच्या गौरवीकरणाची भूमिका कुठेही घेताना दिसत नाहीत. देशीवादाच्या भूमिकेत मात्र आपल्या परंपरांच्या गौरवीकरणाची भूमिका स्वीकारल्याचे दिसते. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे पुरस्कर्ते

ज्या परिवर्तनवादी भूमिकेची अपेक्षा करतात ती प्रत्यक्षात मात्र कोणीही स्वीकारताना दिसत नाही. त्यामुळे नव्वदोत्तर ग्रामीण मराठी कादंबरी ही म. फुल्यांचा परिवर्तनवादी, चिकित्सक विचार न स्वीकारता देशीवादी विचार स्वीकारते असे दिसते. कदाचित ही भूमिका स्वीकारणे ग्रामीण कादंबरीकाराला अधिक सोईचे वाटत असावे. गौरवीकरणाची भूमिका घेतली की चिकित्सा करावी लागत नाही. फक्त बारीकसारीक तपशील देऊन वास्तवाची मांडणी करणे, समस्या मांडणे, दुःखाला वाचा फोडणे या बाबी ही कादंबरी निश्चितपणे करते, पण या वास्तवामागील शोषणयंत्रणांची चिकित्सा ती करीत नाही. फुल्यांचे साहित्य धर्माची, परंपरांची, व्यवस्थेची चिकित्सा करते पण अशी चिकित्सा आजच्या ग्रामीण कादंबरीतून अपवादानेच दिसते. *बारोमास*मधून सदानंद देशमुख यांनी तर *चाळेगत*मधून प्रवीण बांदेकर यांनी ग्रामीण समस्यांमागील कारणांची चिकित्सा केली आहे. गोमंतकीय लेखक गजानन देसाई यांनी खाण व्यवसायामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या गावांचे चित्रण करताना पारंपरिक मूल्ये आणि बदलती मूल्ये यांच्यातील संघर्ष तसेच पारंपरिकता आणि विकास यामधील सहसंबंधावर मार्मिक भाष्य केले आहे. असे भाष्य करताना गावपण टिकवत असतानाच काळासोबत बदलणे आवश्यक आहे हे नेमकेपणाने अधोरेखित केले आहे. कृष्णात खोत यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून बदलत्या वास्तवाचा वेध घेताना माणूस आणि निसर्ग, माणूस आणि प्राणी यांच्यामधील संघर्षाला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला आहे. तर आसाराम लोमटे हे नव्या दमाचे कादंबरीकार शेतकऱ्यांच्या हालाखीच्या परिस्थितीची चिकित्सा करताना शेतकऱ्यांचे दोषदेखील ठळकपणे दाखवून देतात व संघर्षाशिवाय शेतकऱ्याला पर्याय नाही याचे सूतोवाच करतात. परंतु इतर बहुसंख्य ग्रामीण कादंबरीकार मात्र फक्त वास्तवाचे दर्शन या पातळीवरच आपले लेखन मर्यादित ठेवतात. आजची मराठी कादंबरी ग्रामीण साहित्याची चळवळ दावा करते त्याप्रमाणे म. फुल्यांचे चिकित्सावादी तत्त्वज्ञान स्वीकारत नाही त्याचप्रमाणे ती देशीवादाची भूमिकादेखील साकल्याने स्वीकारताना दिसत नाही, असे म्हणता येते. वस्तुतः देशीवादामध्ये आपल्या संस्कृतीचे, परंपरांचे अंधानुकरण अपेक्षित नाही तर त्यातील वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींची निवड करून आधुनिकतेतून आलेल्या बदलांशी संवादी राहून त्यांची पुनर्स्थापना करणे अपेक्षित आहे. पण देशीवादाचे प्रारूप स्वीकारलेल्या मराठी कादंबऱ्या असे करताना दिसत नाहीत. उदाहरणार्थ, जातीयतेची उतरंड, त्यातील संघर्ष, याचे चित्रण ग्रामीण कादंबऱ्यांतून येते परंतु या कादंबरीच्या केंद्रस्थानी

असलेल्या मराठा, कुणबी जातीतील युवकांनी दलित युवतींशी लग्नाचे नातेसंबंध स्थापून नवीन समाजरचनेच्या दृष्टीने पाऊल पुढे टाकल्याचे वर्णन कादंबऱ्यांमधून साकारताना दिसत नाही. अपवाद म्हणून फक्त बा. ह. कल्याणकर यांची *पूर्वसंध्या* ही कादंबरी सांगता येते. आपली नष्ट होऊ लागलेली संस्कृती किती चांगली होती आणि आधुनिकतेमुळे पारंपरिक शेती आणि शेतकरी कसा उद्ध्वस्त होत आहे याची मांडणी केली जाते परंतु आजच्या बदलत्या युगात ही भाबडी अगतिकता जपण्यापेक्षा नव्या आव्हानांचा सामना कसा करता येईल याची मांडणी कादंबऱ्यांमधून होताना दिसत नाही. अविनाश कोल्हे यांनी *चौकट वाटोळी* आणि *पंगतीतलं पान* या कादंबऱ्यांतून आधुनिकता आणि पारंपरिकता यांची सांगड घालणारा नवीन दृष्टिकोन मांडला आहे हे नोंदविले पाहिजे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण कादंबरीचा विचार करता तत्त्वज्ञानाची एक निश्चित बैठक मराठी कादंबरीला नसली तरी आता म. फुल्यांचा चिकित्सावादी दृष्टिकोन, देशीवादी जाणिवा आणि जागतिकीकरणानंतरची बदललेली परिस्थिती या सर्वांमधून जगण्याचा मार्ग काढावा लागेल याची जाणीव कादंबरीकारांना होऊ लागली आहे. कदाचित या घुसळणीतून ग्रामीण कादंबरीचे एक नवे तत्त्वज्ञान आकाराला येण्याची शक्यता गृहीत धरता येईल.

मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रारंभापासूनचा प्रवास पाहता ग्रामीण कादंबरीचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान विकसित झाल्याचे दिसत नाही. प्रारंभीच्या काही मोजक्या कादंबऱ्या म. फुल्यांच्या विचारांच्या प्रभावातून लिहिल्या गेल्या; परंतु तो प्रवाह अल्पायुषी ठरला. त्यानंतरच्या मोठ्या कालखंडावर रंजनवादाचा प्रभाव राहिला व तिचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान विकसित होऊ शकले नाही. त्यानंतर काही कादंबऱ्यांवर साम्यवादाचा प्रभाव निश्चितपणे झाला; पण तोही मर्यादित स्वरूपातच राहिला. त्यानंतरच्या काळात मराठी ग्रामीण कादंबरीचा विस्तार झाला, विषयांचे वैविध्य आले पण तिचे स्वरूप मात्र वास्तववादी चित्रण आणि समस्यांची मांडणी असेच राहिले. अर्थात यातून ग्रामीण परिसरातील दुःख आणि वेदना यांची मांडणी प्रभावीपणे झाली व त्यातून मानवी जगण्याचे तत्त्वज्ञान व्यक्त होऊ लागले. १९९०नंतर जागतिक स्तरावर मोठी उलथापालथ झाली व त्याचे परिणाम ग्रामीण कादंबरीलेखनावरदेखील झाले. मराठी कादंबरीलेखनावर झालेला सर्वात मोठा परिणाम म्हणजे मराठी कादंबरीत देशीवादी जाणिवा अधिक तीव्रतेने व्यक्त होऊ लागल्या. भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादाची सैद्धांतिक मांडणी केली आणि बदललेल्या परिस्थितीत ग्रामीण

लेखकांना ही संकल्पना साहजिकच आपलीशी वाटली. त्यामुळे देशीवादी जाणिवांनी संपृक्त अशा साहित्याची निर्मिती १९९०नंतर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसते. परंतु त्यातून निश्चित स्वरूपाचे तत्त्वज्ञान या कादंबरीतून व्यक्त होताना दिसत नाही. पण काही कादंबरीकारांनी मात्र देशीवाद डोळसपणे स्वीकारताना फुल्यांच्या चिकित्सावादाची त्याला जोड दिली आहे. अर्थात या कादंबऱ्या अत्यल्प आहेत परंतु भावी ग्रामीण कादंबरीचे तत्त्वज्ञान कोणत्या पायावर उभारले जाईल याचे सूतोवाच यातून होताना दिसते.

❖

**संदर्भ**


१. खरात, महेश (२००८): *ग्रामीण साहित्य: आस्वाद आणि आकलन*, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

२. थोरात, हरिश्चंद्र (२०१०): 'आजची मराठी कादंबरी नव्या वाटा', *नागनाथ कोत्तापल्ले गौरवग्रंथ - समकालीन साहित्यचर्चा*, मनोहर जाधव व श्रीकांत देशमुख (संपा.), प्रतिमा प्रकाशन, पुणे.

३. भोळे, भास्कर (२०१०): 'बहुसंस्कृतिवाद आणि मराठी साहित्य', *नागनाथ कोत्तापल्ले गौरवग्रंथ - समकालीन साहित्यचर्चा*, मनोहर जाधव व श्रीकांत देशमुख (संपा.), प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४. मुलाटे, वासुदेव (२००२): 'ग्रामीण साहित्याची सैद्धांतिक भूमिका', *साहित्य: ग्रामीण आणि दलित (डॉ. मदन कुलकर्णी गौरवग्रंथ)*, ईश्वर नंदपूरे (संपा.) विजय प्रकाशन, नागपूर.



**- विनायक बापट**


भ्रमणध्वनी - ९७६४९७१२५६ / ९४२३८३४५८५


इ मेल - vinaybapat.6@gmail.com

vinay.bapat@unigoa.ac.in

## परिशिष्ट 3


तणकट
राजन गवस



बारोमास
सदानंद देशमुख
साहित्य अकादमी
पुरस्कार २००४


ऐसे
कुणबी
भूपाळ



असं जगणं तोलाचं



चाळेगत
प्रवीण दशरथ बांदेकर



वाहतं पाणी
अनिल





इदवास



चिखलवाटा
सुरेंद्र पाटील


गावठाण
कृष्णात खोत



फाटलेलं आभाळ


पाडा
अशोक कौतिक कोळी


बोडखी
प्रतिमा इंगोले


कापूसकाळ


साखरफेरा


जिनगानी


अनिल परुळेकर




एसईझेड
SEZ